defending human rights in the courts and beyond

१२ जुलै २०२१

प्रति

श्री. उद्धव ठाकरे
माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र
मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय
१५४, मॅडम कामा मार्ग,
चर्चगेट, मुंबई ४०००२०

२. श्री. दिलीप वळसे पाटील
माननीय गृहमंत्री

**या विनवणीच्या प्रती यांना पाठवल्या आहेत:**

३. श्री. संजय कुमार
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

४. श्री. एस. व्ही. आचमे
अधिक्षक, तळोजा मध्यवर्ती कारागृह
नवी मुंबई

५. श्री. सी. ए. इंदुरकर
अधिक्षक, भायखळा जिल्हा कारागृह
मुंबई

**विषय:** *कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर, भीमा कोरेगाव प्रकरणी तुरुंगात डांबण्यात आलेल्या १४ जणांच्या सुटकेसाठी विनवणी*

प्रिय श्री. उद्धव ठाकरे,

आम्ही, सर्व भारतीयांच्या स्वातंत्र्य आणि घटनात्मक हक्कांचे समर्थन आणि संरक्षण करण्यासाठी समर्पित मानवी हक्क चळवळ सिटीझन्स फॉर जस्टीस अँड पीस (सीजेपी) मधील कार्यकर्ते, ८४ वर्षीय आदिवासी कार्यकर्ते फादर स्टॅन स्वामी यांच्या ५ जुलै २०२१ रोजी झालेल्या निधनावर तीव्र दु:ख व्यक्त करण्यासाठी तुम्हाला हे पत्र लिहित आहोत. आम्हाला असे समजले की २८ मे रोजी मुंबईतील होली फॅमिली हॉस्पीटलमध्ये त्यांना दाखल केल्यानंतर त्यांची कोविड-१९ ची चाचणी पॉझिटिव्ह आली आणि त्यानंतर त्यांची प्रकृती अधिकाधिक बिघडत गेली. वादाचा मुद्दा म्हणजे १५ मे नंतर त्यांची अवस्था अधिकच तीव्रपणे बिघडत गेली की ज्यावेळी त्यांची प्रकृती खूपच खालावली असून त्यांना भयंकर अशा कोविड-१९

चा संसर्ग झाला आहे अशी माहिती न्यायालयाला प्रथम देण्यात आली होती. तरीही, न्यायालयाने तातडीने या बाबतीत लक्ष घालेपर्यंत कारागृह अधिकारी (आणि NIA अधिकारी) त्यांच्या प्रकृतीच्या स्पष्ट स्थितीविषयी चालढकल करत राहिले. जर त्यांना वेळेवर चांगल्या पद्धतीने उपचार मिळाले असते तर अशा रीतीने त्यांना आपले प्राण गमवावे लागले नसते याची खूप शक्यता होती.

त्यानंतर, फादर स्टॅन स्वामी ऑक्सिजन सपोर्टवर ठेवण्यात आले आणि त्यांना अतिदक्षता विभागात हलवण्यात आले. ४ जुलैला त्याना व्हेंटीलेटरवर ठेवण्यात आले. ५ जुलैच्या पहाटे हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यानंतर ते कधीच शुद्धीवर आले नाहीत. यापूर्वी १७ मे २०२१ रोजी आपल्याकडे केलेल्या पत्र याचिकेतून तळोजा मध्यवर्ती कारागृहात त्यांची प्रकृती कशी खालावत आहे हे आपल्या निदर्शनास आणून दिलेले होते. फादर स्वामी त्यांना ताप, खोकला, पोट बिघडणे असा त्रास होत असल्याची तक्रार वारंवार करत आलेले होते. परंतु आयुर्वेदिक डॉक्टरांनी दिलेल्या प्रतिजैविकांव्यतिरिक्त त्यांच्यावर काहीही उपचार करण्यात आलेले नव्हते. पार्किन्सनने पिडीत या धर्मगुरूंची तब्येत कारागृहात हळूहळू खालावू लागली आणि त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाला हेही सांगितले की गेल्या आठ महिन्यांच्या कारावासात खाणे, स्नान करणे, चालणे, वाचणे अशी दैनदिन कामेही, की जी तुरुंगात येण्यापूर्वी करू शकत होते, ते करू शकत नव्हते. त्यांच्या मृत्यूने तळोजा कारागृहातील सुविधांच्या कमतरता उघडकीस आणल्या आणल्या आहेत. दोन प्रसंगी (त्यातील २४ मे रोजी आलेल्या तीव्र आघातामुळे उद्भवलेला एक) या ८४ वर्षीय वृद्धाला तळोजाहून जातायेता ८४ किमी दूर असलेल्या जे.जे. रुग्णालयात नेण्यात आलेले होते. त्यांच्या मृत्यूने राज्यातील कारागृह अधिकाऱ्यांच्या एकंदर जबाबदारीवर प्रकाशझोत टाकला आहे.

फादर स्वामींच्या निधनाने आम्हा सर्वांच्या मनात एक पोकळी निर्माण केली आहे आणि याचेही तीव्र दु;ख होत आहे की भीमा कोरेगाव खटल्यात गोवण्यात आलेले उर्वरित कार्यकर्ते, शिक्षणतज्ञ, वकील, बुद्धीजीवी लोक खटल्याची प्रतीक्षा करत २०१८ पासून कारागृहात आहेत. या ठिकाणी, तळोजा मध्यवर्ती कारागृह आणि भायखळा कारागृहात असलेल्या कच्च्या कैद्यांच्या (अंडरट्रायल्स) आरोग्य स्थितीचा आणि कोविड-१९ मुळे त्यांच्या आरोग्याबाबत उद्भवू शकणाऱ्या अधिक गुंतागुंतीच्या परिणामांचा आम्हाला पुनरुच्चार करावासा वाटतो. फादर स्टॅन स्वामी यांच्या बाबतीत जे काही घडले त्याबद्दल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आक्रोश व्यक्त करण्यात येत आहे.

आम्हाला आता विशेषतः तळोजा कारागृहातील आणि अन्य कारागृहातीलही सर्व कच्चे कैदी व इतर कैदी यांच्याबद्दल गंभीरपणे चिंता वाटू लागली आहे. आम्हाला अगदी नम्रपणे सादर करावेसे वाटते की महाराष्ट्र शासनाने या दुःखद आणि अकाली निधनाची दखल घ्यावी, आणि तुरुंग व कारागृहांच्या परिस्थितीमध्ये लक्षणीय सुधारणा होतील आणि त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवले जाईल या बाबींची दक्षता घेतली पाहिजे.

याच भीमा कोरगाव कुप्रसिद्ध खटल्यात २८ ऑगस्टपासून भायखळा कारागृहात ठेवण्यात आलेल्या **सुधा भारद्वाज** यांना फुफ्फुसाचा क्षय, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि संधिवात आहे. त्यांच्या दातांची अवस्था अशी आहे की त्याना व्यवस्थितपणे खाताही येत नाही. त्यांचे केस आणि वजन कमी झाले आहेत. गेल्यावर्षी त्यांना इसब झाल्याचा अहवाल आला आला आहे. **प्रा. शोमा सेन** यांनाही वयपरत्वे गंभीर आरोग्य समस्या जाणवत आहेत. **आनंद तेलतुंबडे** यांना दमा आहे. वरीष्ठ वकील **सुरेंद्र गडलिंग** यांच्याप्रमाणेच वरीष्ठ लेखक

**गौतम नवलाखा** अनेक सहव्याधींनी आजारी आहेत. लेखक, वकील आणि कार्यकर्ते **अरुण फरेरा** असोत की **व्हर्मन फर्नांडिस** असोत, त्यांचे शरीरस्वास्थ्य सध्या फार धोक्यात आहे.

आणखी एक सहआरोपी प्रा. **हनी बाबू** यांना मे महिन्यात कोविड-१९ ची लागण झाली आणि त्यात त्यांना डोळ्याला तीव्र संसर्ग झाला. त्या कारणाने ते अद्याप मुंबईतील ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहेत. त्या संसर्गामुळे त्यांच्या डोळ्यातील स्नायूंमध्ये जळजळ होऊ लागली, डोळ्यातील मुख्य रक्तवाहिनीतील रक्त साकळले आणि मेंदूला रक्त पुरवठा करणाऱ्या करोटीय धमनीमध्ये दोष निर्माण झाला, जिचा मेंदूला लक्षणीय असा धोका निर्माण होतो. हे वैद्यकीय अहवाल पाहून मुंबई उच्च न्यायालयाने २० मे २०२१ रोजी राज्य सरकारला निर्देश दिले की त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात यावे. आजतागायत ते खाजगी रुग्णालयात आहेत. ***(Jenny Rowena vs State of Maharashtra and Ors Crl. W.P No. 1983 of 2021)***

जून २०२१ च्या सुरुवातील तळोजा कारागृहातील कैद्यांच्या आरटी-पीसीआर चाचणी मोहिमेत आणखी तीन आरोपी **महेश राऊत, सागर गोरखे** आणि **रमेश गायचोर** कोविड-१९ ने बाधित आढळले. काही अहवालानुसार, त्यांच्यापैकी कोणालाही कोरोनाव्हायरस प्रतिबंधित लस देण्यात आलेली नाही आणि १५ मे २०२१ रोजी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेनुसार सीजेपीला असे समजले की श्री. महेश राऊत यांना एक आठवड्याहून अधिक काळ थंडी, ताप, खोकला आणि अशक्तपणा आलेला होता. **रोना विल्सन** आणि इतर कार्यकर्त्यांचीही गंभीर चिंता वाटावी अशी परिस्थिती आहे.

एप्रिल २०२१ मध्ये आणखी एक सहआरोपी **ज्योती जगपत** याना भायखळा तुरुंगात कोविड-१९ ची लागण झाली. हा जीवघेणा विषाणू, सौम्य असो की मध्यम तीव्रतेचा असो, लोकांवर दीर्घकालीन परिणाम करतो आणि त्यासाठी योग्य आहार, पोषकद्रव्ये आणि आरोग्यसंपन्न जीवनशैलीची आवश्यकता असते.

महोदय, एक कच्चे कैदी आणि याच कथित भीमा कोरेगाव कटातील एक आरोपी डॉ. वरावरा राव यांना २२ फेब्रुवारी २०२१ रोजी, मुंबई उच्च न्यायालयाने खालावलेल्या प्रकृतीच्या कारणावरून जामीन दिला. ***PV Varavara Rao vs NIA and Ors*** (Crl. Appeal No. 52 of 2021) या केसमध्ये जामीन देताना न्यायालयाने असे मत नोंदवले की:

*५०. "या बाबतीत दुसरा एखादा दृष्टिकोन स्वीकारणे याचा अर्थ घटनेच्या २१ व्या कलमानुसार शरीरस्वास्थ्याच्या आधारावर कैद्यांना असलेल्या हक्कांची पायमल्ली करण्यासारखे होईल, विशेषतः जेव्हा उपलब्ध कागदपत्रे निर्देशित करतात की अशा व्यक्तींना तुरुंगात ठेवणे हे अशा व्यक्तींच्या जीवाला धोका निर्माण करू शकते. वय वर्षे ८२ असलेल्या या कच्च्या कैद्याला तसेच वयपरत्वे विविध व्याधींनी ग्रासलेल्या इतर अति वयोवृद्ध व्यक्तींना गजाआड ठेवल्याने त्यांचे शारीरिक स्वास्थ्य खालावण्याचा आणि त्यातून जीवनाच्या अंताकडील त्यांच्या प्रवासाला अधिक वेग देण्याचा धोका निर्माण होतो. अशा परिस्थितीत, तथ्यांच्या आधारे जामीन अर्ज फेटाळला असतानासुद्धा कोठडीतून मुक्त करण्याच्या आदेशाची मागणी करण्याच्या प्रार्थनेचा विचार करताना हा मुद्दा दुर्लक्षित करणे शक्य होणार नाही. वृद्धत्व आणि तदानुषंगिक उद्भवणारे क्षीण मानसिक आणि शारीरिक आरोग्य हा घटक अशा वयोवृद्ध व्यक्तींना गजाआड ठेवण्यासंदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण ठरतो.*

*जरी अशा विविध व्याधीग्रस्त वयोवृद्ध कैद्यांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंदवले गेले असतील तरी हा प्रश्न उद्भवतो की केवळ गंभीर स्वरूपाचे गुन्हे असल्याने अशा व्यक्तींना तुरुंगाच्या गजाआड दुय्यम मानवाचे जीवन जगायला भाग पाडायचे काय? या खटल्यातील वास्तवतेनुसार, NIA न्यायालयाकडून अद्याप आरोप निश्चित करण्यात आलेले नाहीत या खटल्यात २०० साक्षीदार तपासायचे आहेत. त्यामुळे, हा खटला किती कालावधीत पूर्ण होईल हे सांगण्याच्या स्थितीत कोणीही नाही. जेव्हा अशी परिस्थिती घटनात्मक न्यायालयांसमोर येते आणि घटनेच्या २१ कलमाखाली आश्वस्त केल्या गेलेल्या मूलभूत हक्कांचा ठामपणे मांडला जातो तेव्हा वरील प्रश्नाचे उत्तर नकारात्मकच असणार असते."*

वैद्यकीय जामिनाची प्रतीक्षा करत असलेले फादर स्टॅन कोविडच्या गुंतागुंतींमुळे मरण पावले याचा संयुक्त राष्ट्र संघटनेने सुद्धा निषेध व्यक्त केला आहे. ६ जुलै २०२१ रोजी संयुक्त राष्ट्र मानवी हक्काच्या उच्चायुक्तांनी एक पत्र जारी केले की ज्यामध्ये त्यांनी ते किती दुःखी आणि व्यथित झाले आहेत हे स्पष्ट केले आहे. त्या निवेदनात म्हटले आहे की, "उच्चायुक्त मिशेल बॅकलेट आणि संयुक्त राष्ट्रांचे स्वतंत्र तज्ञ यांनी गेली तीन वर्षे वारंवार भारत सरकारकडे फादर स्टॅन आणि या घटनेशी संबंधित इतर १५ मानवी हक्कांचे संरक्षण करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या खटल्यांसंबंधी मुद्दा उपस्थित केलेला होता आणि त्यांना खटलापूर्व कैदेतून मुक्त करण्यात यावे अशी विनंती केलेली होती."

कोविड-१९ महामारीच्या सततच्या तीव्र प्रभावाच्या पार्श्वभूमीवर, संयुक्त राष्ट्र संघटनेने भारतासह सर्वच राष्ट्रांना आवाहन केलेले आहे की केवळ टीकात्मक किंवा विरोधात्मक विचार व्यक्त केल्याबद्दल अटक केलेल्यांसह पुरेसा कायदेशीर आधार नसलेल्या प्रत्येकाला सोडून देण्यात यावे.

माननीय मुख्यमंत्री साहेब, या महामारीमुळे नात्यातील प्रिय व्यक्ती गमावलेली अनेक कुटुंबे उद्धवस्त झाली आहेत आणि अशा विनाशकारी परिस्थितीत तुरुंगातील कच्चे कैदी आणि त्यांचे कुटुंबीय यांच्यामधील नेहमीच्या संपर्क व्यवस्थेमध्ये व्यत्यय निर्माण होऊ लागला आहे. रमा आनंद तेलतुंबडे (आरोपी आनंद तेलतुंबडे यांची पत्नी) आणि सुसान अब्राहम गोन्साल्वीस (आरोपी व्हर्मन गोन्साल्वीस यांची पत्नी) यांनी याचिकाकर्त्या आणि तुरुंगातील त्यांचे अनुक्रमे पती यांच्यामध्ये पत्रव्यवहारास परवानगी देण्याचे न्यायालयाने तळोजा कारागृह अधीक्षकांना निर्देश देण्याविषयी दाखल केलेल्या याचिकेवरून मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकार आणि राष्ट्रीय तपास संस्था (NIA) आणि कारागृह अधिक्षक यांना ३ जुलै २०२१ रोजी नोटीस जारी केली. ***<u>(Rama Anand Teltumbde and Ors vs State of Maharashtra and Ors Crl. W.P No. 2327 of 2021).</u>***

भारतीय राज्यघटनेच्या २१ व्या कलमानुसार आरोग्याचा हक्क हा मूलभूत हक्क आहे आणि सर्व नागरिकांच्या या हक्काचे रक्षण करणे राज्यावर बंधनकारक आहे. थोडक्यात सांगायचे तर, १७ मे रोजी आपल्याला करण्यात आलेल्या पत्र याचिकेत आम्ही मांडलेल्या सर्व मुद्द्यांचा आम्ही पुनरुच्चार करत आहोत.

सीजेपी माननीय <u>मुख्यमंत्री यांना नम्र विनंती व आवाहन करत आहे की, या सर्व १४ आरोपींचा जीव धोक्यात असल्याने त्यांच्या मुक्ततेविषयी शिफारस त्यांनी उच्च स्तरीय समितीकडे करावी. आणखी एखाद्या कच्च्या कैद्याची प्रकृती खालावण्यापूर्वी या बाबीत मध्यस्थी करण्याचे विनम्र आवाहन आम्ही करत आहोत. ते सर्व कायद्याचे पालन करणारे नागरिक आहेत आणि या खटल्याच्या तपासाला बाधा पोहोचेल असे ते</u>

काहीही करणार नाहीत. डॉ. वरावरा राव यांना वैद्यकीय कारणासाठी तुरुंगातून मुक्त करण्यात आल्यामुळे आणि २०० साक्षीदार तपासावे लागणार असल्यामुळे या कच्च्या कैद्यांना इतक्या दीर्घकाळ तुरुंगात खितपत पडू देणे अयोग्य आहे. २१२४ कैदी ठेवण्याची क्षमता असलेल्या तळोजा कारागृहात सध्या कमाल क्षमतेच्या १३३ टक्के जास्त म्हणजे ३५०० कैदी ठेवण्यात आलेले आहेत. कोविड निगेटिव्ह असलेल्या काही कैद्यांची कारागृहाबाहेर चाचणी केली असता ती पॉझिटिव्ह येत आहे याचीसुद्धा नोंद घेणे आवश्यक आहे.

त्यांना त्यांची काळजी लागून राहिलेले आणि त्यांच्या सुटकेची आतुरतेने वाट बघणारे चिंताग्रस्त कुटुंबीय आहेत. आदरणीय मुख्यमंत्री महोदय, यापूर्वी १५ मे रोजी या बाबतीत आपल्याला निवेदन पाठवले होते. त्यामध्ये, आपल्या परमप्रिय महाराष्ट्र राज्यातील प्रगतीशील परंपरांचा मागोवा घेत, आम्ही आवाहन केले होते की राज्याच्या कारागृह अधिकाऱ्यांनी सभ्यतेची आणि जबाबदारीची जाणीव दाखवावी कारण तसे करणे देशाचे आणि राज्याचे कायदे आणि तुरुंग नियमावली यानुसार त्यांच्यावर बंधनकारक आहे. तीन वर्षे उलटून गेली आहेत आणि या विख्यात कार्यकर्ते, बुद्धिजीवी, सामाजिक कार्याकार्यांची तब्येत खालावत चालली आहे.

आपले नम्र,
सिटीझन्स फॉर जस्टीस अँड पीस

नंदन मालुस्ते, सीजेपी अध्यक्ष

तिस्ता सेटलवाड, सीजेपी कार्यवाह

defending human rights in the courts and beyond

श्री. उद्धव ठाकरे
माननीय मुख्यमंत्री
ईमेल: cm@maharashtra.gov.in

श्री. दिलीप वळसे पाटील
माननीय गृहमंत्री
ईमेल: dilipwalsepatil3@gmail.com

श्री. संजय कुमार
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
ईमेल: cs@maharashtra.gov.in

श्री. एस. व्ही. आचमे
अधिक्षक, तळोजा मध्यवर्ती कारागृह
नवी मुंबई
ईमेल: supdtprison.taloja@home.maharashtra.gov.in

श्री. सी. ए. इंदुरकर
अधिक्षक, भायखळा जिल्हा कारागृह
मुंबई
ईमेल: supdtprison.byculla@home.maharashtra.gov.in

**यापूर्वी १५ मे ला दिलेल्या निवेदनातील भाग:**

**कैद्यांना द्यायच्या वैद्यकीय मदतीशी संबंधित कायदे**

महोदय, देशातील सर्व नागरिकांचे आरोग्य आणि स्वास्थ्य सुरक्षित ठेवणे आणि राज्याच्या अकार्यक्षमतेमुळे हे आरोग्य खालावणार नाही याची काळजी घेणे हे राज्याचे कर्तव्य आहे. कारागृह कायदा १८९४ च्या अंतर्गत आखण्यात आलेल्या महाराष्ट्र कारागृह नियमांचे वर्गीकरण, २०१५ यामध्ये तात्काळ वैद्यकीय मदतीची गरज असलेले कैदी आणि कच्चे कैदी यांच्याबाबतच्या बंधनकारक अशा तरतुदी आहेत.

**नियम** ३(२)(५) मध्ये तरतूद आहे की मुख्य वैद्यकीय अधिकारी:

"कारागृहातील पाणीपुरवठ्याचा दर्जा आणि प्रमाण यांच्याकडे विशेष लक्ष देतील. पाण्यात अशुद्ध द्रव्ये असल्याची शंका आल्यास ते त्या पाण्याचे नमुने स्थानिक तपासणी प्रयोगशाळेत पाठवतील आणि आवश्यकता असेल तिथे सुधारणा करून आणतील."

**(६)** पाणी पुरवठ्याचे स्रोत, परिसर आणि वितरण यांची महिन्यातून किमान एकदा तपासणी करतील. जेव्हा पाण्याचे प्रदूषण किंवा भेसळ होण्याची शक्यता असण्याचा संशय येतो तेव्हा क्लोरिनेशन किंवा अन्य मार्गांनी पाणी शुद्ध ठेवण्यासाठी आवश्यक ती पावले उचलतील.

**(१४)** वैद्यकीय अधिकारी टेलीमेडिसीन (दूर-वैद्यकी) पद्धतीने आजारी कैद्यावर उपचार करतील आणि टेलीमेडिसीन व कारागृह रुग्णालयातील उपचार कैद्यांवर उपचार करण्यास अपुरे पडत असतील तर आजारी कैद्याला सरकारी दवाखान्यात पाठवतील.

**सर्वोच्च न्यायालयाचे इतर निकाल**

कैदी आणि कच्चे कैदी यांना भारतीय राज्यघटनेतील २१व्या कलमाने दिलेल्या हमीनुसार जगण्याच्या हक्काखाली आरोग्याचा अधिकार आहे. **सुनील बात्रा (ii) वि. दिल्ली प्रशासन** (१९८०) ३ एससीसी ४८८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हा मुद्दा उचलून धरला आहे की, एखाद्या व्यक्तीला कायद्याने प्रस्थापित प्रक्रियेनुसार तुरुंगात ठेवले असले तरीही त्या व्यक्तीला त्याचे मूलभूत मानवी हक्क नाकारता येत नाहीत. अलीकडेच, तुरुंगात असलेले केरळीय पत्रकार सिद्दिक कप्पन जेव्हा मथुरा कारागृहात आजारी पडले आणि त्यांना कोविड-१९ चा संसर्ग झाला तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले की त्यांना अधिक चांगल्या उपचारासाठी आणि वैद्यकीय देखरेखीसाठी हॉस्पिटलमध्ये हलवण्यात यावे. **Kerala Union of Working Journalists Versus Union Of India & Ors.** (Writ Petition Criminal No. 307 of 2020) मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले, "आम्ही सांगतो की सर्वात मौल्यवान असा जगण्याचा मूलभूत हक्क बिनशर्तपणे कच्च्या कैद्यांनाही लागू होतो."

कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढत असताना आणि भीमा कोरेगाव हिंसाचाराचा खटला सुरू होणे अजून दृष्टीक्षेपातही नसताना अधिक चांगल्या वैद्यकीय सुविधा आणि उपचाराची तीव्रपणे गरज असलेल्या अटकेतील सर्व व्यक्तींना मुक्त करणेच व्यवहार्य ठरेल.

याच खटल्यातील याच तरतुदीखाली आरोप असलेले यांची खालावत चाललेली प्रकृती विचारात घेऊन फेब्रुवारी २०२१ मध्ये डॉ. वरावरा राव यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन देण्यात आला. खंडपीठाने नमूद केले आहे की डॉ. राव यांच्या आरोग्याची अस्थिर अवस्था विचारात घेता त्यांना कच्च्या कैदेत ठेवणे हे घटनेच्या २१ व्या कलमाखालील जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन ठरेल.

न्यायालयाने **Dr. PV Rao vs NIA and others** (Cri. Appeal No. 52 of 2021) या खटल्यात म्हटले आहे की, "अन्य परिस्थितीप्रमाणेच या खटल्यात सुद्धा, प्रतिवादींनी कबूल केले आहे की फिर्यादीकडून २०० साक्षीदार तपासले जाणार आहेत. आरोपपत्रच १००० पानांचे आहे... आमचे असे मत आहे की एखाद्या कच्च्या कैद्याला तुरुंगात टाकणे आणि केवळ त्याचा जमीन अर्ज फेटाळला आहे म्हणून, तब्येत बिघडल्यावर त्याला तेथून सरकारी दवाखान्यात नेणे आणि पुढे तिथे तब्येत अधिक खालावल्यावर न्यायालयाच्या निर्देशानंतर खाजगी विशेष उपचार हॉस्पिटलमध्ये हलवणे आणि अशाप्रकारे त्या कच्च्या कैद्याला इकडून तिकडे आणि तिकडून इकडे नेत राहणे हे घडत असताना घटनात्मक न्यायालय या नात्याने हे न्यायालय या गोष्टी मूकपणे बघत बसू शकत नाही..."

तुरुंगांची अवस्था आणि अशा कठीण काळात कैद्यांच्या आरोग्याबद्दलचे अज्ञान यामुळे या प्रकरणात मानवतावादी दृष्टिकोन आवश्यक आहे. मुंबई उच्च न्यायालयाने सुद्धा कारागृहातील अपुऱ्या सुविधांची दाखल घेतली होती आणि सर्व कैद्यांना असलेल्या सुविधा सुधारल्या जातील अशी आशा व्यक्त केली होती. **High Court on its own motion vs State of Maharashtra and Ors** (Suo Motu PIL No. 1 of 2021) या नावाने न्यायालयाने नोंदवलेल्या जनहित याचिकेत मुख्य न्यायाधीश दीपांकर दत्ता आणि न्यायाधीश जी. एस. कुलकर्णी यांनी हस्तक्षेप करणाऱ्या अर्जदारांपैकी एकाच्या दाखल्याची नोंद घेतली की "सुधारगृहामध्ये पुरेसे डॉक्टर्स, नर्सेस आणि रुग्णसेवा करणारा कर्मचारी वर्ग नसतो. सदर संदर्भ तळोजा सुधारगृहाबाबत आहे जिथे केवळ ३ डॉक्टर्स, आणि तेही आयुर्वेदाचे, उपलब्ध आहेत.

"जर खरोखरच असे असेल तर ते राज्यातील सुधारगृहातील कैद्यांच्या गरजांप्रति राज्याची उदासिनता आणि बेफिकिरी दाखवून देणारे आरोग्य आणि वैद्यकीय सुविधांचे प्रतिबिंब आहे," असे खंडपीठाने स्वतः २९ एप्रिल २०२१ ला दिलेल्या एका आदेशात नमूद केले आहे.

महोदय, भारतीय राज्यघटनेच्या २१व्या कलमाखाली आरोग्याचा अधिकार हा मूलभूत जगण्याचा अधिकार आहे आणि या हक्काचे संरक्षण करणे राज्यावर बंधनकारक आहे. **State of Punjab and Ors vs Mohinder Singh Chawla** (Civil Appeal Number 16980-81 of 1996) मध्ये सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की "हा आता स्थिरावलेला कायदा आहे की आरोग्याचा अधिकार हा जगण्याच्या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे. आरोग्य सुविधा पुरवणे ही सरकारची घटनात्मक बांधिलकी आहे. **Kirloskar Brothers Ltd. vs. Employees State Insurance corporation** 1996 (2) SCC 682 मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने हेच अधोरेखित केले आहे की नागरिकांचे संरक्षण ही राज्याची जबाबदारी आणि कर्तव्य आहे.